# मेट्रो - ३ : ५०.३ किमीचे भुयारीकरण पूर्ण

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून कुलाबा-वांद्रे-सीप्झ या भुयारी मेट्रो-३ चे काम वेगाने सुरू असून, आजघडीला ५४ किमीपैकी ५०.३ किलोमीटरचे भुयारीकरण पूर्ण झाल्याचा दावा कॉर्पोरेशनने केला असून हे प्रमाण टक्क्यात ९३ आहे.

विशेषत: मेट्रो-३च्या २, ४, ५, ६ आणि ७ या पॅकेजमधील भुयारीकरण १०० टक्के झाले असून, सीप्झपासून सायन्स म्युझियमपर्यंतचे भुयार पूर्ण झाले आहे, अशी माहिती देखील कॉर्पोरेशनकडून देण्यात आली.

यात सीएसएमटी, दादर, धारावी, बीकेसी, विमानतळ आणि एमआयडीसी अशा महत्त्वाच्या स्थानकांचा समावेश आहे.

दरम्यान, नुकतेच मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे सहार रोड ते राष्ट्रीय विमानतळ स्थानक हा १.५ किलोमीटर लांबीचा ३६ वा भुयारीकरणाचा टप्पा पूर्ण करण्यात आला. तापी-१ आणि तापी-२ या दोन टनेल बोअरिंग मशिन्सच्या मदतीने पॅकेज ६ ने एकूण ४.४ किमीचे भुयारीकरण पूर्ण केले.



मेट्रोचे जलगदतीने पूर्ण करून मुंबईकरांना दर्जेदार सेवा देण्याचा सरकारचा हेतू आहे. त्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मेट्रो सुरू झाल्यास रस्त्यावर वाहतूककोंडी कमी होईल. प्रदूषणाचा विळखा कमी होईल. मुंबईची हवा दूषित होत आहे, असे वारंवार पर्यावरण तज्ज्ञ सांगत असतात. प्रदूषण रोखण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही पर्यावरण रक्षकांकडून होत असते.

मेट्रो सुरू झाल्यास मुंबईतील हवेचा दर्जा सुधारेल, असा अंदाज वर्तवण्यात येत आहे.